।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

EXAMINATION SECTION
Phone: (02462) 229294 website: srtmun.ac.in e-mail: directorboee@gmail.com

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२०-२१/११२२ दिनांक : २४/०३/२०२१

## :: तातडीचे परीपत्रक ::

प्रति,
प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्राचार्य/तथा क्लस्टर हेड महाविद्यालय, हिवाळी-२०२० परीक्षा,
प्राचार्य/तथा परीक्षा केंद्र प्रमुख, हिवाळी-२०२० परीक्षा,
संचालक, सर्व संकुले, नांदेड परिसर,
संचालक, लातूर व परभणी, उपकेंद्र,
प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली,
समन्वयक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास संशोधन केंद्र, किनवट, प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : हिवाळी-२०२० परीक्षेच्या सुधारीत वेळापत्रकाबाबत.
संदर्भ : परीक्षा विभागाचे परीपत्रक क्र. परीक्षा/समन्वय/२०२०-२१/११००, दिनांक १९/०३/२०२१.

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय परीपत्रकास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, दिनांक २३/०३/२०२१ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या तातडीच्या बैठकीमध्ये सद्या प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षेत्रात Covid-19 या विषाणूचा वाढता प्रादुर्भाव तसेच मा.जिल्हाधिकरी यांनी Lockdown च्या संदर्भाने निर्गमीत केलेल्या सुचना, आदेश लक्षात घेता क्लस्टर पध्दतीने महाविद्यालयस्तरावर व विद्यापीठामार्फत घेण्यात येणा-या हिवाळी-२०२० परीक्षांच्या तारखामध्ये बदल करण्यात आलेला आहे, त्यानुसार सर्व परीक्षांच्या सुधारीत तारखा खालील प्रमाणे आहेत.

### क्लस्टर पध्दतीने महाविद्यालयस्तरावर होणा-या परीक्षेंच्या सुधारीत तारखा

| अ. क्र | अभ्यासक्रम | पूर्वीच्या तारखा | सुधारीत तारखा |
|---|---|---|---|
| ०१ | पदवी अभ्यासक्रम प्रथम वर्ष (पहिले व दुसरे सत्र) | ०१/०४/२०२१ ते १२/०४/२०२१ | ०६/०४/२०२१ ते १७/०४/२०२१ |
| ०२ | बी.सी.ए. व बी.सी.एस. प्रथम वर्ष (पहिले व दुसरे सत्र) | ०१/०४/२०२१ ते १२/०४/२०२१ | ०६/०४/२०२१ ते १७/०४/२०२१ |
| ०३ | पद्व्युत्तर अभ्यासक्रम व इतर व्यावसायिक अभ्यासक्रम प्रथम वर्ष (पहिले व दुसरे सत्र) | १०/०४/२०२१ ते २०/०४/२०२१ | या परीक्षेच्यां तारखेत कोणताही बदल नाही. |
| ०४ | औषध निर्माणशास्त्र, आभियांत्रिकी, विधी, बी.एड., एम.एड., एम.बी.ए., एम.पी.एड. इ. प्रथम वर्ष अभ्यासक्रम (पहिले व दुसरे सत्र) | २०/०४/२०२१ ते ३०/०४/२०२१ | या परीक्षेच्यां तारखेत कोणताही बदल नाही. |



On Page no…2

## विद्यापीठस्तरावर होणा-या परीक्षेंच्या सुधारीत तारखा

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | सर्व पदवी व व्यावसायिक अभ्यासक्रम: बी.सी.ए., बी.सी.एस., बी.एस्सी. (H.S., I.T., N.T., B.T., B.I., F.S. व इतर) सर्व बी. होक., आभियांत्रिकी, विधी व फार्मसी अंतीम वर्ष | २२/०३/२०२१ ते ३१/०३/२०२१ | ०६/०४/२०२१ ते १६/०४/२०२१ |
| ०६ | पद्व्युत्तर एम.ए., एम.कॉम, एम.एस्सी. व व्यावसायिक अभ्यासक्रम: बी.एड., एम.एड., बी.पीएड., एम.पीएड., बी.लिब, एम.लिब. बी.जे. एम.जे अभ्यासक्रम अंतीम वर्ष तसेच एक वर्ष पदविका | २२/०३/२०२१ ते ३१/०३/२०२१ | १७/०४/२०२१ ते २६/०४/२०२१ |
| ०७ | सर्व संकुले-विद्यापीठ परीसर नांदेड, उपकेंद्र लातूर व परभणी येथील सर्व पद्व्युत्तर अभ्यासक्रम व इतर. (पहिले व दुसरे सत्र) | ०१/०४/२०२१ ते १०/०४/२०२१ | १५/०४/२०२१ ते २४/०४/२०२१ |

सबब, वरील प्रमाणे परीक्षा बदलाच्या तारखाची नोंद सर्व प्राचार्य/क्लस्टर हेड प्रमुखांनी घेवून परीक्षेची पूर्व तयारी करावी व सुधारीत वेळापत्रके तयार करून आपल्या क्लस्टर अंतर्गत असलेल्या महाविद्यालयास वितरीत करावेत. तसेच विद्यापीठामार्फत घेण्यात येणा-या सर्व परीक्षांचे वेळापत्रक परीक्षा विभागामार्फत विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहेत.

दिनांक १६/०३/२०२१ पासून सुरू झालेल्या पदवी परीक्षेच्या वेळापत्रकात कोणताही बदल नसल्यामुळे दिनांक २७/०३/२०२१ रोजीचा शेवटचा पेपर वेळापत्रकानुसारच घेण्यात येणार आहे.

हिवाळी-२०२० परीक्षेतील ज्या सत्रपध्दतीच्या अभ्यासक्रमासाठी प्रात्यक्षिक परीक्षा लागू असेल अशा अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षा हया ऑलनाईन व ऑफलाईन पध्दतीने संबधीत अभ्यासक्रमाच्या लेखी परीक्षा संपन्न झाल्यानंतर आठ दिवसाच्या आत महाविद्यालयस्तरावर घेवून त्याचे गुण ऑनलाईन पध्दतीने परीक्षा विभागाकडे पाठवावेत.

तसेच वरील प्रमाणे हिवाळी-२०२० परीक्षा ऑफलाईन पध्दतीने महाविद्यालयस्तरावर व परीक्षाकेंद्रावर घेताना शासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या कोविड-१९ या विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनाचे पालन करणे बंधनकारक राहील. शासनाने कोविड-१९ करीता पारीत केलेल्या सर्व परीपत्रकाचे अनुपालन करावे. शासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या परीपत्रकाच्या अधीन राहून वेळापत्रकामध्ये बदल करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे हिवाळी-२०२० परीक्षेबाबतच्या सुधारीत तारखांची नोंद घेवून सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून द्यावी, हि विनंती.

आपला,

**डॉ. रवि एन. सरोदे**
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव:**
मा.कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
मा. प्र-कुलगुरू,महोदय, प्रस्तुत विद्यापीठ

**जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ** - या परीपत्रकाची नोंद घेवून सविस्तर बातमी तयार करून चारही जिल्हयातील सर्व वृत्तपत्रात विनामूल्य प्रसिध्द करावी.